# बृहन्मुंबई महानगरपालिका
# पशुवैद्यकीय आरोग्य विभाग
# बर्ड – फ्ल्यु प्रश्नावली

**प्र :** एव्हीयन इन्फ्ल्युएन्झा (बर्ड फ्ल्यु) म्हणजे काय ?

**उ :** बर्ड फ्ल्यु हा पक्ष्यांचा विषाणुजन्य रोग असून, तो आर्थोमिक्झो-विरीडे (H5N1) या विषाणु कुंटुंबातील 'अ' गटामुळे होतो.

**प्र :** हा रोग कोणत्या प्रकारच्या पक्षांमध्ये व प्राण्यांमध्ये आढळतो.

**उ :** निसर्गामध्ये हा विषाणू स्थलांतरीत, तसेच कावळे, बदके, कबुतरे, टर्की, कोंबडया या पक्ष्यांमध्ये प्रामुख्याने आढळतो.

**प्र :** हया रोगाचा प्रसार कसा होतो ?

**उ :** १) बाधित पक्षांच्या नाकातील स्त्राव व विष्ठा यांच्याशी निरोगी पक्षांचा थेट संबंध आल्यास हा रोग पसरु शकतो.

2) दुषित खादय, पाणी उपकरणे इत्यादी मुळे सुध्दा रोगाचा प्रसार होऊ शकतो.

3) पक्षी एकमेकांच्या सानिध्यात आल्यामुळे सुध्दा रोगाचा प्रसार होऊ शकतो.

**प्र :** बर्ड फ्ल्यु हा माणसांमध्ये आढळतो का ?

**उ :** बर्ड फ्ल्यु या रोगाच्या विषाणूचा प्रार्दभाव प्रामुख्याने पक्ष्यांमध्ये व डुक्करांमध्ये आढळतो. या प्राण्यांव्यतिरीक्त या विषाणूचा प्रार्दुभाव इतर प्राणी व माणसांमध्ये शक्यतो आढळत नाही.

**प्र :** कोंबडीचे मांस खाल्यामुळे या रोगांचा प्रसार माणसांमध्ये होतो का ?

**उ :** नाही, कारण भारतीय खादयसंस्कृतीमध्ये चिकन/मटण, अंडी उकडवून शिजवून खाल्ले जाते. त्यामुळे या तापमानाला हा विषाणू जिवंत राहू शकत नाही.

**प्र :** कोंबडीची अंडी खाल्यामुळे हा रोग होऊ शकतो का ?

**उ :** अंडी उकडून खाल्ली जातात, त्या तापमानाला हे विषाणू जिवंत राहू शकत नाहीत. त्यामुळे उकडलेली अंडी खाल्याने हा रोग होऊ शकत नाही.

**प्र :** माझ्या परिसरात मृत पक्षी आढळल्यास मी काय करु ?

**उ :** आपल्या परिसरात मृत पक्षी आढळल्यास त्वरीत महानगरपालिकेच्या १९१६ या संपर्क क्रमांकावर संपर्क करण्यात यावा.

**प्र :** चिकन व अंडी विक्रेते यांनी काय काळजी घ्यावी ?

**उ :** १) चिकन व मटण विक्री करणा-या दुकानदारांनी आपल्या दुकानाची जैवसुरक्षा यंत्रणा सक्षम करावी.

२) दुकानात दररोज स्वच्छता व निर्जंतुकीकरण करावे.

३) जिवंत पक्षांना हातळताना मास्क व ग्लोव्हजचा वापर करावा.

४) पक्षी विक्री केल्यानंतर खुराडयांची संपूर्ण स्वच्छता व निर्जतुकीकरण करणे आवश्यक आहे.

५) निर्जंतुकीकरणासाठी ०१ लिटर पाण्यामध्ये ०७ ग्रॅम धुण्याचा सोडा (सोडीयम कार्बोनेट) या द्रावणाचा अथवा सोडीयम हायपोक्लोराईड / चुनकळीचा वापर करावा.

६) चिकन दुकानांमधील कोंबडयांचे टाकाऊ पदार्थ गोळा करुन कावळे व इतर पक्ष्यांच्या संपर्कात येणार नाही अशा पध्दतीने एकत्र करुन ठेवणे.